# सायबर सुरक्षावर 'केबीपी'त मार्गदर्शन

लोकमत न्यूज नेटवर्क

सातारा : कर्मवीर भाऊराव पाटील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडिज अँड रिसर्च वर्ये, ता. सातारा येथे सायबर सुरक्षा मार्गदर्शन शिबिर पार पडले. बीसीए विभाग फाउंडेशन व महाराष्ट्र पोलीस सायबर सेल यांच्या समन्वयाने सुरू केलेले सायबर गुन्हे रोखण्यासाठी सायबर सुरक्षा सामाजिक कार्याची सुरुवात करण्यात आली.

केबीपी मॅनेजमेंटने आयोजित सायबर जागृता दिवस या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेची माहिती देण्यात आली. तसेच पथनाट्य अशा विविध प्रकारातून त्यांनी ही माहिती युवकापर्यंत पोहोचण्यासाठी जनजागृती सुरू केली आहे. प्रभात फेरीत सायबर सिक्युरिटी संबंधित नारे देण्यात आले. रॅली व पथनाट्यातून लोकांना इंटरनेटचे शिकार होण्यापासून वाचूया. आपल्याला आलेला ओटीपी आणि आपला आधार नंबर कोणालाही शेअर करू नये, तसेच खासगी माहिती देऊ नयेत, असे संदेश नागरिकांपर्यंत पोहोचवले.

V9
Rear Camera